सकाळ

# सायबर वॉर भविष्यातील मोठा धोका

## धीरज देशपांडे : 'रवळनाथ'तर्फे सहकार सप्ताहानिमित्त वेबिनार

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १९ : डिजिटलायझेशनमध्ये डेटा चोरी, सर्व्हर हॅक करणे, तंत्रज्ञान बंद पाडून संपूर्ण व्यवस्था विस्कळीत करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात होण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे भविष्यात आंतरराष्ट्रीय पातळीवर सायबर वॉरच्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे सायबर सिक्युरिटीबाबत सर्वांनीच खबरदारी घ्यायला हवी, असे मत चार्टर्ड अकौंटंट धीरज देशपांडे (सांगली) यांनी व्यक्त केले.

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त वेबिनार झाले. डिजिटलायझेशन आणि सायबर सिक्युरिटी या विषयावर देशपांडे बोलत होते. 'रवळनाथ'चे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती.

देशपांडे म्हणाले, ''सायबर हल्ल्याचे वाढते धोके लक्षात घेता वित्तीय संस्थांनी सायबर सिक्युरिटी निधी उभारून वेळोवेळी सिस्टीम ऑडिट करून घ्यायला हवे. व्यक्तिगत पातळीवर ग्राहकांनी आपले पासवर्ड दर पंधरा दिवसांनी बदलले पाहिजेत. त्याचबरोबर सायबर विमा उतरवायला हवा.''



गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटीतर्फे आयोजित वेबिनारमध्ये धीरज देशपांडे यांनी मार्गदर्शन केले.

चौगुले यांनी स्वागत केले. प्रास्ताविकात त्यांनी सायबर सिक्युरिटीविषयी ज्ञान असणे काळाची गरज असल्याचे सांगितले. 'रवळनाथ'चे संचालक आणि गडहिंग्लज, आजरा, चंदगड, बेळगाव, निपाणी, जयसिंगपूर, कोल्हापूर, कुडाळ, सांगली, पुणे येथील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. आयटी प्रमुख विजय बुगडे यांनी सूत्रसंचालन केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

### व्यक्तिगत खबरदारी हवी...

■ धीरज देशपांडे म्हणाले, "सोशल मीडिया आणि बँकेकडे नोंद असलेला मोबाईल क्रमांक वेगवेगळा हवा. प्रतिदिन ऑनलाईन आर्थिक व्यवहारावर नियंत्रण हवे. सार्वजनिक वायफायचा वापर टाळला पाहिजे. मोबाईलमध्ये सुरक्षित भारतीय ॲपचा वापर करावा. संस्थांनी ग्राहकांना सुरक्षितता देण्यासह ग्राहकांनीही व्यक्ति गत पातळीवर सायबर सुरक्षितता ठेवली पाहिजे."